नि.फौ.ख.क्रं.७२/२०२५
सरकार वि. तनु आणि ईतर
नि.क्र. २७

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०३ यांची जबानी.</u>**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | माणिक रामनाथ पंचभाई, |
| वय सुमारे | : | ४८ वर्ष, व्यवसाय– मजुरी |
| निवासस्थान | : | खैरी दिवान, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**<u>सरतपास</u> — <u>सहा</u>. <u>सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत</u>–**

१. पोलीसांनी मला पंचनाम्याकरीता बोलावले होते. पोलीसांनी मला लेखी सूचनापत्र देऊन बोलावले नव्हते. माझ्यासमक्ष पंचनामा करण्यात आला होता. आता मला निशाणी क्रमांक २४ वरील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. आता मला निशाणी क्रमांक २५ वरील जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपीतर्फे वकील आर. जी. काटेखाये साहेब यांच्यामार्फत –</u>**

२. सही करण्याआधी घटनास्थळ पंचनामा मी वाचला नव्हता. घटनास्थळ पंचनाम्यात चतुर्सिमा लिहीण्यात आल्या होत्या. घटनास्थळाच्या पूर्वेस प्रकाश टेंभरे यांचे मकान आहे. घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर माझ्या लक्षात नाही. पंचनाम्याच्यावेळी घटनास्थळी हजर असलेले दुसरे पंच पोलीस पाटील वर्षा पंचभाई होत्या. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ आणि पंचनाम्यावर सहया मी पोलीस स्टेशनमध्ये केल्या. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ आणि जप्ती पंचनामे माझ्यासमक्ष करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही.**

<table>
<tr><td align="center">समक्ष<br><br>स्वा/–<br>(व्ही. आर. फरकुंडे)<br>न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२),<br>पवनी.<br>१७/१०/२०२५</td><td align="center">श्रवणोत्तर स्विकृत<br><br>स्वा/–<br>(व्ही. आर. फरकुंडे)<br>न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२)<br>पवनी.<br>१७/१०/२०२५</td></tr>
</table>